दिनांक :     .०३.२०२०

प्रति,

माननीय केंद्रीय गृहमंत्री,

भारत सरकार, नवी देहली.

**विषय : देहलीत दंगली भडकावून हिंदु आणि पोलीस यांना लक्ष्य करून जीवे मारणार्‍या, तसेच सार्वजनिक मालमत्तेची प्रचंड हानी करणार्‍या धर्मांधांवर कठोर कारवाई करण्याविषयी...**

महोदय,

देशाची राजधानी देहली येथे फेब्रुवारी २०२० च्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या दंगलीत ४२ हून अधिक जणांना त्यांचे प्राण गमवावे लागले, तर २५० हून अधिक जण घायाळ झाले आहेत. दंगलखोरांनी नागरिकांची घरे, दुकाने, वाहने आणि सार्वजनिक संपत्ती यांची इतकी प्रचंड तोडफोड अन् जाळपोळ केली की, ही हानी कधीही भरून न येणारी आहे. या हिंसाचारात पोलीस हवालदार रतनलाल आणि गुप्तचर विभागाचे पोलीस अंकीत शर्मा यांना वेचून ठार मारण्यात आले. याचा अर्थ दंगलखोरांना पोलिसांचीही भीती राहिलेली नाही. पोलिसांना जीवे मारण्याइतपत दंगलखोरांची मजल जाते, यातून दंगल सुनियोजित आणि लक्ष्य ठरवून केली कि काय याबाबत शंका घेण्यास वाव आहे. ही दंगल देहलीतील चांदबाग, सीलमपूर, भजनपुरा, मौजपूर, यमुना विहार आदी भागात घडवण्यात आली. वर्ष १९८४ च्या इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या शीखविरोधी दंगलीनंतर प्रथमच इतका मोठा हिंसाचार देहली येथे झाला. जी परिस्थिती आतापर्यंत काश्मीरमध्ये पहायला मिळत होती, तशी देशाच्या राजधानीत पहायला मिळाली. तरी या प्रकरणी आम्ही आपल्या लक्षात आणून देत आहोत की,

१. देहलीतील दंगल घडवून आणण्यासाठीचे कारण, वेळ, ठिकाण आणि पद्धत या गोष्टी धर्मांधांनी अचूकपणे साधल्या. ही दंगल जेथे झाली, तेथून संसद भवन, राष्ट्रपती भवन आणि सर्वोच्च न्यायालय अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर आहे. ही दंगल संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत दौर्‍याच्या कालावधीत आणि तेही ट्रम्प आग्र्याहून देहलीला पोचताच घडवण्यात आली.

२. या हिंसाचारात धर्मांधांकडून हत्या करण्यात आलेले गुप्तचर विभागाचे पोलीस अंकित शर्मा यांचा प्राथमिक शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्यात धर्मांधांनी शर्मा यांच्या शरिरावर ४०० वेळा चाकूने भोसकून अत्यंत अमानुष आणि निर्घृणतेने हत्या केल्याचे उघड झाले आहे.

३. या दंगलीच्या प्रकरणी देहली पोलिसांनी आम आदमी पक्षाचे नगरसेवक ताहिर हुसेन आणि काँग्रेसच्या माजी नगरसेविका इशरत जहां या दोघांना अटक केली आहे. यावरून धर्मांधच दंगलीला कारणीभूत आहेत, हेच यावरून सिद्ध होते.

४. या दंगलीमध्ये चांदबाग परिसरातील आम आदमी पक्षाचे नगरसेवक ताहिर हुसेन यांच्या कार्यालयाच्या छतावर असंख्य पेट्रोल बाँम्ब, दगड-विटांनी भरलेल्या असंख्य गोण्या, काड्यापेट्या असे मोठ्या प्रमाणात दंगलीचे विध्वंसक साहित्य आढळून आले. या हिंसाचारामध्ये दंगलखोरांकडून ६०० गोळ्या झाडण्यात आल्या आहेत.

५. अंकीत शर्मा यांची हत्या करण्यापूर्वी जमावाने त्यांना पकडून खेचत ताहिर हुसेन यांच्या घरात आणले

आणि तेथेच त्यांची हत्या करण्यात आली, असे आरोप होत आहेत. यावरून दंगली आणि हत्या यांमध्ये ताहिर हुसेन यांचा सहभाग स्पष्टपणे दिसून येतो.

६. देहलीत झालेल्या हिंसाचाराची जी काही छायाचित्रे समोर आली आहेत, त्यात धर्मांधच हिंसाचार करत असल्याचे दिसून येत आहे. यात शाहरूख नावाच्या गुंडाकडून एका पोलीस शिपायाच्या समोर हवेत ८ गोळ्या झाडल्या. देहली पोलिसांनी माहिती दिली आहे की, या हिंसाचारामागे नासीर टोळी आणि छेनू टोळी यांचा हात असल्याची शक्यता आहे. पोलिसावर गोळीबार करणारा शाहरूख हा छेनू टोळीचा गुंड असून त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

७. 'सीएए'च्या विरोधात शाहीन बाग येथे धर्मांधांनी गेल्या अडीच मासांपासून रस्त्यावरच ठिय्या मांडला होता. एवढा विरोध करूनही सरकारने धर्मांधांना जुमानले नाही. याचाच राग धर्मांधांमध्ये होता का ? आणि त्यातून ही दंगल घडवण्यात आली का ?, याचेही अन्वेषण होणे आवश्यक आहे.

८. दंगलखोरांनी जमा केलेले साहित्य पहाता, ते एका दिवसात आणले असण्याची शक्यता नाही. अर्थात याची सिद्धता गेली अनेक दिवस चालू होती. यासाठी दंगलखोरांना साहाय्य करणाऱ्यांचाही शोध घेणे आवश्यक आहे.

**⁕ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

१. या प्रकरणाचे 'राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणे'कडून सखोल अन्वेषण करण्यात यावे.

२. धर्मांधांची यंत्रणा नष्ट करण्यासाठी एक कृती आराखडा सिद्ध करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच अशा घटनांत सहभागी मौलवी किंवा धर्मगुरु, तसेच राजकीय नेते यांचीही सखोल चौकशी करून त्यांच्यावरही कठोर कारवाई करावी.

३. अशा घटना रोखण्यासाठी 'विशेष कायदा' पारित करून धर्मांध मानसिकतेच्या गुंडांना समाजहितासाठी कठोरातील कठोर शिक्षा देण्यात यावी. याच दंगलखोरांकडून नागरिकांची आणि सार्वजनिक मालमत्तेची झालेली हानीभरपाई वसूल करण्यात यावी.

४. जे धर्मांध लोकप्रतिनिधी या दंगलीत सहभागी असतील, त्यांच्यावर 'राष्ट्रीय सुरक्षा कायद्या'न्वये कारवाई करण्यात यावी.

आपला विश्वासू,

ि

ह

द